## निशाणी क्र.२२ व ३४ वरील एकत्रीत आदेश

प्रस्तुतचे अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे व आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन असे की,**

०२. प्रस्तुत दावा वादी यांनी प्रतिवादी विरूध्द मालकी जाहीर करून ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दावा प्रलंबीत असताना तसेच ४ हेक्टर ५३ आर क्षेत्र मा. न्यायालयाने प्रतिवादींनी दाव्यात हजर होईपर्यंत वाद जमीन कुणासही हस्तांतर करू नये म्हणून दिनांक ०९.०९.२०२० रोजी आदेश पारीत केलेला असताना मयत प्रतिवादी क्र.३ हिने तिच्या नावावरील मिळकत कोणताही हक्क व अधिकार नसताना खरेदीखत क्र.१२७९/२०२२ हे दिनांक २३.०३.२०२२ रोजी तिचे मुलींच्या नावे करून दिली. सरद खरेदीखत हे विनामोबदला व विनाताबा केवळ वादींचे हक्क हिरावुन घेण्याच्या हेतूने केलेले आहे. त्यामळे प्रतिवादी क्र.३ हिच्या मुलींना दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. करिता वादी यांनी अर्जात नमुद दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले की, वादी यांचे सदरील अर्ज बेकायदेशीर असुन नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज त्यावरील शपथपत्र, प्रतिवादी यांचे म्हणणे यांचे अवलोकन करुन वादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्यामध्ये अर्जात नमूद दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार

नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी, प्रतिवादीमधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी निशाणी क्र.२२ व ३४ वरील अर्जात मागितलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी व तशी दावा दुरुस्तीची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी.

०३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये २००/– (रक्कम रुपये दोनशे फक्त) प्रतिवादी यांना द्यावी.

स्वाक्षरित/–

दिनांकः ०५.०८.२०२४. (श्रीमती आर. व्ही. पाटील )
भोकरदन. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भोकरदन.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः ०५.०८.२०२४.

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही